फौ.कि.अर्ज क्र.३९५/२०२५

<u>सत्यपडताळणी</u>

<u>मी सत्यप्रतिज्ञेवर कथन करतो की,</u>
**माझे नाव** – ज्ञानेश्वर शांतराम रोडे,
**वय** – ४६ वर्षे, **व्यवसाय** – वकील व शेती,
**पत्ता** – गुळानी, ता. खेड, जि. पुणे.

**०१.** सन २००३ पासून मी राजगुरुनगर न्यायालयात वकील म्हणून व्यवसाय करत आहे. मी पुणे, जुन्नर व घोडेगाव येथील न्यायालयातही वकीली व्यवसाय करतो. मी सन २००३ पासून चांगला वकीली व्यवसाय करतो व माझ्याकडे भरपूर प्रकरणे आहेत व माझे समाजात चांगले नाव स्थान आहे व वकीली व्यवसायातदेखील माझ्याकडे आदराने पाहिले जाते.

०२. दि.०४/१०/२०२३ रोजी तिसरे सह दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर, यांच्या न्यायालयात दुपारच्या सत्रात मी पिठासीन न्यायाधीश एम.बी. पाटील यांच्यासमोर बसून होतो. त्यावेळी स्पे.मु.क्र.३३७/२०१४ या प्रकरणाचे कामकाज सुरु होते. सदर प्रकरणात प्रतिवादी तर्फे कुलमुखत्यार म्हणून दिलीप नामदेव ढेरंगे हे साक्षीदाराच्या पिंजऱ्यात उभे राहून साक्ष देत होते. त्यावेळी त्यांचे वकील मिलींद सोपान रोडे हे उपस्थीत होते. त्यावेळी वकील दिपक गावडे हे देखील उपस्थित होते. तसेच न्याय कक्षात बरेच विधीज्ञ व पक्षकार उपस्थित होते. त्यावेळी दिलीप नामदेव ढेरंगे यांचे वकील एम.एस . रोडे यांनी न्यायालयाकडे मी काहीतरी बडबड करुन कामकाजात व्यत्यय आणत आहे अशी तक्रार केली. त्यावेळी न्यायालयाने त्यांना कामात व्यत्यय येत नाही व तो येणार नाही याची दक्षता न्यायालय घेईल तुम्ही बसून घ्या असे त्यांना सांगितले. त्यानंतर त्यांची साक्ष झाली. दुसऱ्या दिवशी दि.०५/१०/२०२३ रोजी दिलीप नामदेव ढेरंगे व त्यांचे वकील मिलींद रोडे यांनी विचारविनीमय करुन माझ्याविरुध्द एक तक्रार अर्ज त्याचे शपथपत्र तयार केले. त्यामध्ये असे कथन केले की, दि.०४/१०/२०२३ रोजी मे. न्यायालयात साक्ष सुरु असताना मी सदर साक्षीदाराचे साक्ष याची न्यायालयाच्या परवानगीशिवाय मोबाईलमध्ये चित्रिकरण केले. ते चित्रिकरण मी साक्षीदाराच्या संमतीशिवाय केले व ते सामाजिक माध्यमावर प्रसारीत (व्हायरल) केले व ते दिलींप ढेरंगे यांनी स्वतः पाहिले. त्यामुळे माझ्यावर योग्य ती फौजदारी कारवाई करावी असे अर्जात त्यांनी नमुद केले.

०३. दि.०५/१०/२०२३ रोजी दिलीप ढेरंगे यांनी स्पे.मु.क्र.३३७/२०१४ हा मुकद्दमा त्या दिवशीच्या बंदावर घेण्यासाठी अर्ज दिला व त्या दाव्यात सदर मजकुराचा तक्रारी

अर्ज व शपथपत्र दाखल केले. त्या अर्जाची दखल घेवून न्यायालयाने मला नोटीस काढली. ती नोटीस मला राजगुरुनगर वकील संघांच्या कक्षामध्ये वकीलांसमोर बेलीफांनी बजावली. दि.१८/१०/२०२४ रोजी मी न्यायालयासमोर वकीलांमार्फत हजर झालो. त्यादिवशी मी जबाब देण्यासाठी मुदत मागितली. प्रकरणाच्या पुढील तारखेस मी माझे म्हणणे आणि शपथपत्र दाखल केले. मी न्यायालयास दिलीप नामदेव ढेरंगे यांच्या अर्जास स्वतंत्र फौजदारी किरकोळ अर्ज क्रमांक देण्यात यावा असे निवेदन केले. त्यानंतर २ ते ३ तारेखेला दिलीप नामदेव ढेरंगे व त्यांचे वकील हजर राहीले नाही नंतर वकील श्री.एम एस रोडे यांनी तो अर्ज नॉट प्रेस केला. तो अर्ज त्यांनी प्रकरणाच्या तारखेदिवशी नॉटप्रेस केला नाही व त्याकरीता न्यायालयाची परवानगी घेतली नाही. अर्ज नॉटप्रेस केला ही बाब मी न्यायालयाच्या निदर्शास आणून दिली. त्यानंतर न्यायालयाने दिलीप नामदेव ढेरंगे नोटीस काढून त्यांना बजावण्याचा आदेश पारीत केला.त्या नंतरही ते न्यायालयात हजर राहीले नाहीत व त्यांचे म्हणणेही मांडले नाही. न्यायालयाने माझा तया अर्जावर युक्तीवाद ऐकून घेतला. न्यायालयाने त्यांचा तक्रारी अर्ज नॉटप्रेस केल्यामुळे निकाली काढला.

०४. दिलीप नामदेव ढेरंगे यांनी दिलेल्या अर्जावरुन मला जी नोटीस काढण्यात आली व ती नोटीस बार रुममध्ये वकील सहकार्यासमोर बजावली त्यामुळे माझ्या विषयीचे मत वकील संघामध्ये कलुषीत झाले तसेच संबंधीत न्यायाधीश, त्या न्यायालयात काम करणारे सर्व कर्मचारी तसेच त्या दिवशी उपस्थित असणारे वकील व पक्षकार यांच्या मनातही माझ्याविषयीचे मत कलुषीत करण्यात आले. त्यामुळे माझ्याकडून पक्षकारांनी कामे काढून घेतली. सदर प्रकरणाची चर्चा झाल्याने मला अनेक लोकांचे फोन आले त्यामुळे माझी बदनामी झाली. त्यामुळे माझे आर्थिक, सामाजीक, व्यवसायीक व मानसिक नुकसान झाले. सदर प्रकरणात माझी बदनामी झाली म्हणून मी आरोपीविरूध्द प्रस्तुतची फिर्याद दाखल केली आहे.

१२/११/२०२५

साक्षीदाराची सही/अंगठा

समक्ष,

१२/११/२५

**(स्वाती भा.नाईकनवरे-गरड)**
न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग,
न्यायालय क्र.१, खेड- राजगुरुनगर,जि.पुणे.

दिनांक १२/११/२०२५
खेड- राजगुरुनगर